# महाराष्ट्र शासन

# समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,

# ३ चर्च पथ, पुणे-४११००१

दुरध्वनी क्र. ०२०/२६१३७१८६,२६१२७५६९ ईमेल - swcedn.nationalscholar@gmail.com

********************************************************************************

*निवेदन*

**सन २०२५-२६ या वर्षात देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती या योजनेकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.**

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या **शासन निर्णय क्र.ईबीसी-२०१७ /प्र.क्र.४०२/शिक्षण-१, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१७, व शासन शुध्दीपत्रक क्र.ईबीसी-२०१७ /प्र.क्र.४०२/शिक्षण-१, दिनांक १९ मार्च, २०१८ अन्वये** सुधारीत केलेल्या नियमानुसार प्रत्येक वर्षी राज्यातील अनुसूचित जातीच्या (नवबौध्दासहित) **१००** विद्यार्थ्यांना देशातील भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या http://mhrd.gov.in/institutions या संकेतस्थळा वरील मान्यता प्राप्त AIIMS, IIM, IIT, IIITs, NIT, IISc & IISER, Institution of National Importance & Other Colleges तसेच शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “ब” मध्ये नमूद शैक्षणिक संस्थांच्या इतर शाखा/उपशाखा असल्यास तसचे भविष्यात सदर शैक्षणिक संस्थांच्या इतर शाखा/उपशाखा निर्माण झाल्यास त्यामध्ये प्रवेश घेणाऱ्याविद्यार्थ्यांना देखील सदरहु योजना लागू राहिल. या नामांकित संस्थामधील पदवी/ पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका (आय.आय.टी. मधील प्रिपरेटरी कोर्स वगळुन) पुर्णवेळ अभ्यासक्रमांसाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता अनुसूचित जातीच्या (नवबौध्दासहित) विद्यार्थ्यांकडून **गुरु वार दि. ०४ /०९/२०२५ सायंकाळी** ६.१५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी खालील निकषाप्रमाणे अटी व शर्ती पूर्ण करणारे विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र असतील-**

१. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीचा (नवबौध्दासहित) व महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असावा.

२. विद्यार्थ्यांने पदवी अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना पदवीसाठी राज्य शासनाच्या किंवा इतर राज्याच्या/केंद्र शासनाच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा. तसेच पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविकासाठी राज्य शासनाच्या किंवा इतर राज्याच्या/केंद्र शासनाच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा.

३. या शिष्यवृत्तीसाठी विहीत केलेल्या विद्यापीठ/संस्थांमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पुर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा.

४. पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची कमाल वयोमर्यादा **२५ वर्षे** व पदव्युत्तर पदवी/ पदविका अभ्यासक्रमासाठी कमाल वयोमर्यादा **३० वर्षे** इतकी राहील.

५. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे एकुण वार्षिक उत्पन्न ₹ ६.०० लाखाच्या आत असणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्यांचे पालक नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म नं.१६ व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार) यांनी दिलेले मागील अर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७. इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार) यांनी दिलेले मागील अर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

८. **शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे आवश्यक :**

(अ) या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील अन्य परिक्षा मंडळातून इयत्ता १० वी व १२ वी ची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(आ) या योजनेंतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांचे इयत्ता १२ वी च्या परीक्षेतील गुण विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. त्याकरीता विद्यार्थ्यांने इयत्ता १२ वी च्या परीक्षेत किमान ५५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील.

(इ) तसेच, पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांचे डिप्लोमाच्या परिक्षेतील गुण विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. त्याकरिता विद्यार्थ्याने डिप्लोमाच्या परिक्षेत किमान ५५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहिल.

(ई) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीकरीता पदवी अभ्यासक्रमातील गुणांची टक्केवारी विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. त्याकरीता विद्यार्थ्यांने पदवी परीक्षेमध्ये किमान ५५ टक्के गुण (संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीतील सर्व सत्रांच्या एकूण प्राप्त गुणांची टक्केवारी) मिळविणे आवश्यक राहील. तसेच, CGPA व GPA च्या बाबतीत संबंधित विद्यापीठाचे टक्केवारी रुपांतरण प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

(उ) संबंधित अर्जदार विद्यार्थी हा या योजनेअंतर्गत विहीत केलेल्या संस्थांमध्ये पदवी/ पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमांसाठी त्या त्या संस्थांची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रवेशित झालेला असावा.

(ऊ) निवड वर्षामध्ये शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १०० पेक्षा कमी असल्यास किमान गुणवत्तेची अट शिथिल करण्यात येईल. मात्र उर्वरित अटी व शर्ती या कायम राहतील.

९. राज्यातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण परिक्षा मंडळाच्या परिक्षेत्रातील रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांची खालीलप्रमाणे मंडळनिहाय निवड करण्यात येईल.

**अभ्यासक्रमांसाठी मंडळनिहाय आरक्षण खालीलप्रमाणे असेल**

| अ.क्र. | अभ्यासक्रम स्तर | | | विभागीय शिक्षण परिक्षा मंडळ निहाय (प्रत्येक विद्यार्थी) | एकूण विद्यार्थी (९ मंडळे) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पदवी | अ) | इ.१२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी | ८ | ७२ |
| | | ब) | डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांसाठी | १ | ९ |
| २. | पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका | | | २ | १८ |
| ३. | पदव्युत्तर पदवी / पदविका (राज्यस्तर) | | | -- | ९ |
| | **एकूण** | | | | १०० |

टीप :

(१) १०० विद्यार्थी संख्येच्या मर्यादेच्या अधिन राहून एखाद्या परिक्षा मंडळामध्ये कमी विद्यार्थी पात्र ठरल्यास दुसऱ्या मंडळातील विद्यार्थ्याची गुणानुक्रमानुसार अंतर्गत परिवर्तनाने बदल करुन निवड करण्याचे अधिकार निवड समितीस राहतील.

(२) इतर परिक्षा मंडळाच्या परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या अर्जदारांचा विचार हा तो ज्या जिल्ह्यातून परिक्षा उत्तीर्ण झाला असेल त्या जिल्ह्यासाठीच्या विभागीय शिक्षण मंडळांतर्गत करण्यात यावा. यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला विचारात घेण्यात येईल.

**१०. या शिष्यवृत्ती अंतर्गत विद्यार्थ्यांना मिळणारे लाभ खालील प्रमाणे असतील :-**

(अ) राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यास संबंधित विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेने अभ्यासक्रमासाठी ठरवून दिलेले पूर्ण शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक इत्यादी शुल्क संबंधित विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेमार्फत संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येईल. संबंधित विद्यार्थ्याने विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेला शुल्क अदा केल्याचे पुरावे आयुक्तालयास सादर करणे आवश्यक राहील.

(आ) संबंधित विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेने आकारणी केलेले शुल्क तसेच, भोजन शुल्काची सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यास पात्र असतील.

(इ) जे विद्यार्थी वसतिगृहात जागेअभावी अन्यत्र राहत असतील अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह शुल्क व भोजन शुल्काची रक्कम ही तो शिक्षण घेत असलेल्या संबंधित संस्थेच्या आकारणी करण्यात येत असलेल्या वसतिगृह शुल्क व भोजन शुल्क रक्कमेच्या मर्यादेत सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यास पात्र असतील.

(ई) जे विद्यार्थी डे-स्कॉलर म्हणून शिक्षण घेत असतील त्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतील गटानुसार निर्वाह भत्ता सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यास पात्र असतील.

(उ) योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांस अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या पुस्तकांसाठी ₹ ५,०००/- व शैक्षणिक साहित्य तसेच, इतर शैक्षणिक खर्च यासाठी एकूण ₹ ५,०००/- अशी एकूण ₹ १०,०००/- प्रत्येक वर्षी संबंधित विद्यार्थ्यास त्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर दोन टप्प्यात अदा करण्यात येईल. यासाठीचा तपशिल संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत विहित नमुन्यात आयुक्तालयास सादर करणे बंधनकारक असेल.

**११. इतर अटी-शर्ती खालीलप्रमाणे असतील :-**

(१) महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण परिक्षा मंडळाच्या विभागीय मंडळाच्या एखाद्या परिक्षेत्रातून संबंधित शैक्षणिक वर्षामध्ये विहित विद्यार्थी संख्या उपलब्ध झाली नाही तर अन्य विभागीय परिक्षा मंडळातून तेवढ्या संख्येच्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येईल.

(२) संबंधित निवड वर्षामध्ये योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १०० पेक्षा कमी असल्यास व शासन निर्णय क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र.४०२/शिक्षण-१, दि. ८ नोव्हेंबर, २०१७ व शासन शुध्दीपत्रक क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र.४०२/शिक्षण-१, दि. १९ मार्च, २०१८ परिशिष्ट-"ब" येथील संस्थामधील प्रवेशित अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांनी द्वितीय किंवा पुढील वर्षी या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती साठी विद्यार्थ्यांनी अर्ज केलेला असल्यास त्यांचे अर्ज योजनेच्या अटी व शर्तीप्रमाणे विचारात घेता येतील.

(३) वरील (१) व (२) प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर संबंधित निवड वर्षामध्ये शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १०० पेक्षा कमी असल्यास शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या संस्थांमध्ये महाराष्ट्र राज्यातील प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज विचारात घेता येतील व त्यांच्या बाबत किमान गुणवत्तेची अट शिथिल करण्यात येईल. मात्र, उर्वरित अटी व शर्ती या कायम राहतील.

(४) या योजनेच्या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थी अर्ज करेल त्यावर्षी तो पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्गाला (अर्जदार विद्यार्थी डिप्लोमाधारक असेल तर तो पदवीच्या दुसऱ्या वर्गाला) शिकत असला पाहिजे.

(५) या योजनेअंतर्गत संपुर्ण अभ्यासक्रमाच्या कालावधीत विद्यार्थी एक वेळ अनुत्तीर्ण झाल्यास, अनुत्तीर्ण झालेल्या वर्षाची शिष्यवृत्ती त्यास देय ठरणार नाही. परंतु, संबंधित विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यास पुढील शिष्यवृत्ती देय ठरेल. तसेच संबंधित विद्यार्थी अभ्यासक्रम कालावधीत दोन वेळा अनुत्तीर्ण झाल्यास पुढील कालावधीची शिष्यवृत्ती देय होणार नाही.

**१२. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची पध्दती खालील प्रमाणे असतील :-**

या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी या निवेदनासोबत दिलेल्या विहित नमून्यातील अर्ज नमूद विहित कालावधीत समक्ष/पत्राद्वारे आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे सादर करावा.

(अ) शिष्यवृत्ती अर्जासोबत विद्यार्थ्याने पुढील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे:-

(i) महाराष्ट्राचा रहिवाशी असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र,
(ii) जातीचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला) तसेच, जात वैधता प्रमाणपत्र,
(iii) फॉर्म नं.१६, उत्पन्नाचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला) व आयकर विवरण पत्र परिच्छेद (इ) (२) व (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे,
(iv) इयत्ता १२ वीचा शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला,
(v) संस्थेत प्रत्यक्ष प्रवेश मिळाल्याचे संबंधित संस्थेचे पत्र,
(vi) आधार कार्ड, पॅन कार्ड (पालकाचे) व आधार संलग्न बँक खात्याचा तपशिल.
(vii) संपुर्ण गुणपत्रिका, इ.१२वी/डिप्लोमा/पदवी इत्यादी परिक्षांच्या सर्व वर्षाच्या गुणपत्रिका

१३. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी १०० पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास पुन्हा जाहिरातीद्वारे अर्ज मागवुन १०० विद्यार्थ्यांचा कोटा पुर्ण करण्यात येईल.

१४. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्याला भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही. तसेच, विद्यार्थ्याला संबंधित संस्थेत मिळणारे विद्यावेतन, फेलोशिप अन्य कोणतेही लाभ अभ्यासक्रम कालावधीत मिळत असल्यास ते वजा करुन उर्वरित शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

१५. विहीत केलेल्या विद्यापीठ/संस्थांमध्ये प्रवेशित अभ्याक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेला अभ्यासक्रम विहीत कालावधीत पुर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल.

१६. अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम संबंधित विद्यार्थी/ पालक/ कुटुंबाकडुन वरील अधिनियमाद्वारे वसूल करण्यात येईल.

१७. विद्यार्थ्याने शिष्यवृती मिळण्यासाठी चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास तो फौजदारी गुन्ह्याखाली कारवाईस पात्र ठरेल व त्याला अदा करण्यात आलेली शिष्यवृत्ती महसूली अधिनियमाखाली वसूलपात्र राहील.

१८. या योजनेअंतर्गत निवड केलेल्या विद्यार्थ्यांच्या अंतिम निवडी बाबतचे आदेश शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात येतील.

१९. सदर शिष्यवृत्तीच्या बाबत महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

२०. शिष्यवृत्तीसाठी निवड प्रक्रिया ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय विस्तारभवन, मुंबई यांच्या दि. ०८ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णय व शासन शुध्दीपत्रक क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र.४०२/शिक्षण-१, दि. १९ मार्च, २०१८ मध्ये नमूद केलेल्या व वेळोवेळी सुधारणा केलेले पध्दती प्रमाणे होईल. या नियमात काही सुधारणा केल्यास याबाबत विद्यार्थ्यास अवगत करण्यात येईल.

२१. तसेच विहित नमुन्यातील अर्जाचा नमुना महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ (वेबसाईट) www.maharashtra.gov.in/ताज्याघडामोडी आणि सामाजिक न्याय विभागाच्या संकेतस्थळावर संपर्क साधावा. विहितनमुन्यातील अर्ज संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन तो परिपूर्ण भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह दि. ०४ . ०९.२०२५ **पूर्वी आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च पथ, पुणे-४११००१ यांचेकडे सादर करावा.**

२२. तसेच अर्ज विहित नमुन्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे. अपुर्ण आणि विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

स्थळ : पुणे
दिनांक : ३१ /०७/२०२५

(बाबासाहेब बेलदार)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

# ANEXTURE - B

( Appendix of GR No.EBC-2017/CR402/Shikshan-1 Dated 8th November,2017 )

**List of Instituets / Colleges applicable for Rajashri Shahu Maharaj Merit Scholarship**

| Sr. | No. | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT) | Website |
|---|---|---|---|
| 1 | 1 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), GANDHI NAGAR | http://www.iitgn.ac.in/ |
| 2 | 2 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), BHUBANESHWAR | http://www.iitbbs.ac.in/ |
| 3 | 3 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), MADRAS | http://www.iitm.ac.in/ |
| 4 | 4 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), GUWAHATI | http://www.iitg.ernet.in/ |
| 5 | 5 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), INDORE | http://www.iiti.ac.in/ |
| 6 | 6 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), KANPUR | http://www.iitk.ac.in/ |
| 7 | 7 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), JODHPUR | http://www.iitj.ac.in/ |
| 8 | 8 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), KHARAGPUR | http://www.iitkgp.ac.in/ |
| 9 | 9 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), HYDERABAD | http://www.iith.ac.in |
| 10 | 10 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), MUMBAI | http://www.iitb.ac.in/ |
| 11 | 11 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), PATNA | http://www.iitp.ac.in/ |
| 12 | 12 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), DELHI | http://www.iitd.ac.in/ |
| 13 | 13 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), ROPAR | http://www.iitrpr.ac.in/ |
| 14 | 14 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), MANDI | http://www.iitmandi.ac.in/ |
| 15 | 15 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), ROORKEE | http://www.iitr.ernet.in/ |
| 16 | 16 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (BANARAS HINDU UNIVERSITY), VARANASI | http://iitbhu.ac.in |
| 17 | 17 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), JAMMU | http://iitjammu.ac.in |
| 18 | 18 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), PALAKKAD | http://iitpkd.ac.in |
| 19 | 19 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), TIRUPATI | http://iittp.ac.in/ |
| 20 | 20 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), GOA | http://www.iitb.ac.in/en/iit-goa |
| 21 | 21 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT), BHILAI | https://www.iitbhilai.ac.in/ |
| 22 | 22 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (IIT) DHARWAD | http://www.iitdh.ac.in/ |
| 23 | 23 | INDIAN INSTITUTE OF TECHNOLOGY (INDIAN SCHOOL OF MINES), DHANBAD | http://iitism.ac.in/ |
| **Sr.** | **No.** | **INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY (IIIT)** | **Website** |
| 24 | 1 | ABV -Indian Institute of Information Technology and Management Morena Link Road Gwalior - 474003 | http://www.iiitm.ac.in/ |
| 25 | 2 | Indian Institute of Information Tehnology (IIIT) Deoghat, Jhalwa, Allahabad - 211 002 | http://www.iiita.ac.in/ |
| 26 | 3 | Indian Institute of Information Tehnology, Design and Manufacturing (IIITDM) Kancheepuram, Melakottaiyur, Chennai - 600048 | http://www.iiitdm.ac.in/ |
| 27 | 4 | Pandit Dwarka Prasad Mishra Indian Institute of Information Technology, Design and Manufacturing (IIITDM) IT Bhawan, Jabalpur Engg. Campus, Ranjhi, Jabalpur, Madhya Pradesh - 482011 | http://www.iiitdmj.ac.in/ |
| 28 | 5 | Indian Institute of Information Tehnology, Design and Manufacturing (IIITDM) Kurnool, Andhra Pradesh – 600127 | http://www.iiitdm.ac.in/iiitk.html |
| **Sr.** | **No.** | **INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY IN PPP MODE** | **Website** |
| 29 | 1 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TEHNOLOGY, CHITTOOR, ANDHRA PRADESH | http://www.iiits.ac.in/ |
| 30 | 2 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TEHNOLOGY, GUWAHATI | http://www.iiitg.ac.in/ |

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | 3 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TEHNOLOGY, , KALYANI, WEST BENGAL | http://www.iiitkalyani.edu.in/ |
| 32 | 4 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, UNA, HIMACHAL PRADESH | http://www.iiitu.ac.in/ |
| 33 | 5 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, VADODARA GUJARAT | http://www.iiitvadodara.ac.in/ |
| 34 | 6 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, KOTA, RAJASTHAN | http://www.iiitkota.ac.in/ |
| 35 | 7 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, TIRUCHIRAPPALLI, TAMIL NADU | http://www.iiitt.ac.in/ |
| 36 | 8 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, SONEPAT, HARYANA | www.iiitu.ac.in/ |
| 37 | 9 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, SENAPATI, MANIPUR | http://www.iiitmanipur.ac.in |
| 38 | 10 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, LUCKNOW, UTTAR PRADESH | https://iiita.ac.in/ |
| 39 | 11 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, KOTTAYAM, KERALA | www.iiitkottayam.ac.in/ |
| 40 | 12 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, DHARWARD, KARNATAKA | http://iiitdwd.ac.in |
| 41 | 13 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, PUNE, MAHARASHTRA | www.iiitp.ac.in/ |
| 42 | 14 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, BHOPAL, MADHYA PRADESH | mapit.gov.in/iiitbhopal.aspx |
| 43 | 15 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, AGARTALA, TRIPURA | http://nielit.gov.in/agartala/ |
| 44 | 16 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, KAKINADA, ANDHRA PRADESH | https://www.iiits.ac.in/ |
| 45 | 17 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, NAGPUR, MAHARASHTRA | http://iiitn.ac.in/ |
| 46 | 18 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, RANCHI, JHARKHAND | http://iiitranchi.ac.in/ |
| 47 | 19 | INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY, SURAT, GUJARAT | http://svnit.ac.in/iiitsurat/ |
| **Sr.** | **No.** | **ALL INDIA INSTITUTE OF MEDICAL SCIENCES (AIIMS)** | **Website** |
| 48 | 1 | ALL INDIA INSTITUTE OF MEDICAL SCIENCES, PATNA, BIHAR (ID: U-0686) | http://aiimspatna.org/ |
| 49 | 2 | ALL INDIA INSTITUTE OF MEDICAL SCIENCES, RAIPUR, CHHATISGARH (ID: U-0690) | http://www.aiimsraipur.edu.in/ |
| 50 | 3 | ALL INDIA INSTITUTE OF MEDICAL SCIENCES, DELHI (ID: U-0096) | http://www.aiims.edu/en.html |
| 51 | 4 | ALL INDIA INSTITUTE OF MEDICAL SCIENCES, BHOPAL, MADHYA PRADESH (ID: U-0687) | http://www.aiimsbhopal.edu.in/ |
| 52 | 5 | ALL INDIA INSTITUTE OF MEDICAL SCIENCES, BHUBANESHWAR, ODISHA (ID: U-0688) | www.aiimsbhubaneswar.edu.in/ |
| 53 | 6 | ALL INDIA INSTITUTE OF MEDICAL SCIENCES, JODHPUR, RAJASTHAN (ID: U-0689) | https://www.aiimsjodhpur.edu.in/ |
| 54 | 7 | ALL INDIA INSTITUTE OF MEDICAL SCIENCES, RISHIKESH, UTTRAKHAND (ID: U-0691) | https://www.aiimsrishikesh.edu.in/ |
| **Sr.** | **No.** | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT (IIM)** | **Website** |
| 55 | 1 | INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, VASTRAPUR, AHMEDABAD | http://www.iimahd.ernet.in/ |
| 56 | 2 | INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, VISAKHAPATNAM, ANDHRAPRADESH | http://iimv.ac.in |
| 57 | 3 | INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, BANGALORE, KARNATAKA | http://www.iimb.ernet.in/ |
| 58 | 4 | INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, BODH GAYA, BIHAR | http://iimbg.ac.in |
| 59 | 5 | INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, RAIPUR, CHHATTISGARH | http://www.iimraipur.ac.in/ |

| | | | |
|---|---|---|---|
| **60** | 6 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, MDU ROHTAK, HARYANA** | http://www.iimrohtak.ac.in |
| **61** | 7 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, SIRMAUR, HIMACHAL PRADESH** | http://www.iiml.ac.in/ |
| **62** | 8 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, RANCHI, JHARKHAND** | http://www.iimranchi.ac.in/ |
| **63** | 9 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, KOZHIKODE, KERALA** | http://www.iimk.ac.in/ |
| **64** | 10 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, KOLKATA, WEST BENGAL** | http://www.iimcal.ac.in/ |
| **65** | 11 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, LUCKNOW, UTTARPRADESH** | http://www.iiml.ac.in/ |
| **66** | 12 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, INDORE, MADHYAPRADESH** | http://www.iimidr.ac.in/ |
| **67** | 13 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, VNIT CAMPUS, NAGPUR, MAHARASHTRA** | http://iimnagpur.ac.in |
| **68** | 14 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, SAMBALPUR, ODISHA** | http://www.iimsambalpur.ac.in |
| **69** | 15 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, AMRITSAR, PUNJAB** | http://iimamritsar.ac.in |
| **70** | 16 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, UDAIPUR, RAJASTHAN** | http://www.iimu.ac.in/ |
| **71** | 17 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, SHILLONG, MEGHALAYA** | http://www.iimshillong.in/ |
| **72** | 18 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, TIRUCHIRAPPALLI, TAMIL NADU** | http://www.iimtrichy.ac.in/ |
| **73** | 19 | **INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT, KASHIPUR, UTTARAKHAND** | http://www.iimkashipur.ac.in |
| | **No.** | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY (NIT)** | **Website** |
| **74** | 1 | **DR. B.R. AMBEDKAR NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, PUNJAB** | http://www.nitj.ac.in/ |
| **75** | 2 | **MALAVIYA NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, JAIPUR, RAJASTHAN** | http://www.mnit.ac.in/ |
| **76** | 3 | **MAULANA AZAD NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, BHOPAL** | http://www.manit.ac.in/ |
| **77** | 4 | **MOTILAL NEHRU NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, ALLAHABAD, U.P** | http://www.mnnit.ac.in/ |
| **78** | 5 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, MIZORAM, CHALTLANG, AIZAWL** | http://www.nitmz.ac.in/ |
| **79** | 6 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, WARANGAL, TELANGANA** | http://www.nitw.ac.in/ |
| **80** | 7 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, YUPIA, PAPUM PARE, ARUNACHAL PRADESH** | http://www.nitap.in/ |
| **81** | 8 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, SILCHAR, ASSAM** | http://www.nits.ac.in/ |
| **82** | 9 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, PATNA, BIHAR** | http://www.nitp.ac.in/ |
| **83** | 10 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, CALICUT** | http://www.nitc.ac.in/ |
| **84** | 11 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, RAIPUR, CHHATTISGARH** | http://www.nitrr.ac.in/ |
| **85** | 12 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, DELHI** | http://nitdelhi.ac.in/ |
| **86** | 13 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, GOA** | http://www.nitgoa.ac.in/ |
| **87** | 14 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, HAMIRPUR, H.P.** | http://nith.ac.in/ |
| **88** | 15 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, KURUKSHETRA, HARYANA** | http://www.nitkkr.ac.in/ |
| **89** | 16 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, HAZARATBAL, SRINAGAR, J&K** | http://www.nitsri.net/ |
| **90** | 17 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, JAMSHEDPUR, JHARKHAND** | http://www.nitjsr.ac.in/ |
| **91** | 18 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, MANIPUR** | http://www.nitmanipur.ac.in |
| **92** | 19 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, MEGHALAYA** | http://www.nitm.ac.in/ |
| **93** | 20 | **NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, NAGALAND** | http://nitnagaland.ac.in/ |

| | | | |
|---|---|---|---|
| 94 | 21 | NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, ROURKELA, ORISSA | http://www.nitrkl.ac.in/ |
| 95 | 22 | NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, PUDUCHERRY | http://www.nitt.edu/home/nitp/ |
| 96 | 23 | NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, SRINIVASANAGAR, SURATHKAL, KARNATAKA | http://www.nitk.ac.in/ |
| 97 | 24 | NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, SIKKIM | http://www.nitsikkim.ac.in/ |
| 98 | 25 | NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, TIRUCHIRAPALLI, TAMIL NADU | http://www.nitt.edu/ |
| 99 | 26 | NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, AGARTALA, TRIPURA | http://www.nita.ac.in/ |
| 100 | 27 | NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, UTTARKHAND | http://nituk.ac.in/ |
| 101 | 28 | NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, DURGAPUR, WEST BENGAL | http://www.nitdgp.ac.in/ |
| 102 | 29 | SARDAR VALLABHBHAI NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, ICHCHHANATH, SURAT, GUJARAT | http://www.svnit.ac.in/ |
| 103 | 30 | VISVESVARAYA NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, NAGPUR | http://www.vnit.ac.in/ |
| 104 | 31 | NATIONAL INSTITUTE OF TECHNOLOGY, ANDHRA PRADESH | http://www.nitandhra.ac.in/ |
| **Sr.** | **No.** | **INSTITUTES OF NATIONAL IMPORTANCE** | **Website** |
| 105 | 1 | SCHOOL OF PLANNING & ARCHITECTURE VIJAYWADA, ANDHRA PRADESH | www.spav.ac.in/ |
| 106 | 2 | SCHOOL OF PLANNING & ARCHITECTURE, NEW DELHI | spa.ac.in/ |
| 107 | 3 | SREE CHITRA TIRUNAL INSTITUTE FOR MEDICAL SCIENCES AND TECHNOLOGY, THIRUVANANTHAPURAM, KERALA | https://www.sctimst.ac.in/ |
| 108 | 4 | ATAL BIHARI VAJPAYEE INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY AND MANAGEMENT, GWALIOR, MADHYA PRADESH | https://www.iiitm.ac.in/ |
| 109 | 5 | SCHOOL OF PLANNING & ARCHITECTURE BHOPAL, MADHYA PRADESH | www.spabhopal.ac.in/ |
| 110 | 6 | JAWAHARLAL INSTITUTE OF POST GRADUATE MEDICAL EDUCATION & RESEARCH, PUDUCHERRY | ipmer.edu.in/ |
| 111 | 7 | NATIONAL INSTITUTE OF PHARMACEUTICAL, EDUCATIONAL AND RESEARCH, MOHALI, PUNJAB | www.niper.ac.in/ |
| 112 | 8 | ACADEMY OF SCIENTIFIC & INNOVATIVE RESEARCH, TAMIL NADU | acsir.res.in/ |
| 113 | 9 | DAKSHINA BHARAT HINDI PRACHAR SABHA, TAMIL NADU | www.dbhpscentral.org/ |
| 114 | 10 | RAJIV GANDHI NATIONAL INSTIUTE OF YOUTH DEVELOPMENT, TAMIL NADU | www.rgniyd.gov.in/ |
| 115 | 11 | MOTILAL NEHRU INSTITUTE OF TECHNOLOGY, ALLAHABAD, UTTAR PRADESH | www.mnnit.ac.in/ |
| 116 | 12 | RAJIV GANDHI INSTITUTE OF PETROLEUM TECHNOLOGY, RAE BARELI, UTTAR PRADESH | www.rgipt.ac.in/ |
| 117 | 13 | INDIAN STATISTICAL INSTITUTE, KOLKATA, WEST BENGAL | www.isical.ac.in/ |
| 118 | 14 | INDIAN INSTITUTE OF ENGINEERING SCIENCE AND TECHNOLOGY, SHIBPUR, WEST BENGAL | www.iiests.ac.in/ |
| **Sr.** | **No.** | **CENTRAL UNIVERSITIES** | **Website** |
| 119 | 1 | ALIGARH MUSLIM UNIVERSITYALIGARH | http://www.amu.ac.in/ |
| 120 | 2 | ASSAM UNIVERSITYSILCHAR | http://www.aus.ac.in |
| 121 | 3 | DR. BABASAHEB BHIMRAO AMBEDKAR UNIVERSITY, VIDYA VIHAR, RAE BAREILI ROAD, LUCKNOW | http://www.bbau.ac.in/ |
| 122 | 4 | BANARAS HINDU UNIVERSITYVARANASI | http://www.bhu.ac.in/ |
| 123 | 5 | CENTRAL UNIVERSITY OF BIHARBIT CAMPUS, P.O.:B.V. COLLEGE, PATNA | http://www.cub.ac.in/ |
| 124 | 6 | CENTRAL UNIVERSITY OF GUJARAT GANDHINAGAR | http://www.cug.ac.in/ |

| | | | |
|---|---|---|---|
| 125 | 7 | CENTRAL UNIVERSITY OF HARYANA | http://www.cuh.ac.in |
| 126 | 8 | CENTRAL UNIVERSITY OF HIMACHAL PRADESH | http://www.cuhimachal.ac.in/ |
| 127 | 9 | CENTRAL UNIVERSITY OF JAMMU | http://www.cujammu.in |
| 128 | 10 | CENTRAL UNIVERSITY OF JHARKHAND | http://cuj.ac.in/ |
| 129 | 11 | CENTRAL UNIVERSITY OF KARNATAKA GULBARGA | http://www.cuk.ac.in/ |
| 130 | 12 | CENTRAL UNIVERSITY OF KASHMIR, SRINAGAR | http://www.cukashmir.ac.in/ |
| 131 | 13 | CENTRAL UNIVERSITY OF KERALA TRIVANDRUM | http://www.cukerala.ac.in/ |
| 132 | 14 | CENTRAL UNIVERSITY OF ORISSA | http://cuo.ac.in/ |
| 133 | 15 | CENTRAL UNIVERSITY OF PUNJAB BHATINDA | http://www.cup.ac.in |
| 134 | 16 | CENTRAL UNIVERSITY OF RAJASTHANDIST-AJMER | http://www.curaj.ac.in/ |
| 135 | 17 | CENTRAL UNIVERSITY OF TAMIL NADU, TIRUVARUR | http://www.cutn.ac.in |
| 136 | 18 | DR. HARISINGH GAUR VISHWA VIDYALAYASAGAR, MADHYA PRADESH | http://www.dhsgsu.ac.in/ |
| 137 | 19 | GURU GHASIDAS VISHWAVIDYALAYABILASPUR, CHHATISGARH | http://www.ggu.ac.in/ |
| 138 | 20 | HEMVATI NANDAN BAHUGUNA GARHWAL UNIVERSITYSRINAGAR, UTTARKHAND | http://www.hnbgu.ac.in |
| 139 | 21 | INDIRA GANDHI NATIONAL OPEN UNIVERSITY (IGNOU) NEW DELHI | http://www.ignou.ac.in/ |
| 140 | 22 | INDIRA GANDHI NATIONAL TRIBAL UNIVERSITY, AMARKANTAK, MADHYA PRADESH | http://igntu.nic.in/ |
| 141 | 23 | JAMIA MILLIA ISLAMIAJAMIA NAGAR, NEW DELHI | http://jmi.ac.in/ |
| 142 | 24 | JAWAHARLAL NEHRU UNIVERSITYNEW MEHRAULI ROAD, NEW DELHI | http://www.jnu.ac.in/ |
| 143 | 25 | MAHATMA GANDHI ANTARRASHTRIYA HINDI VISHWAVIDYALAYA, VARDHA (MAHARASHTRA) | http://www.hindivishwa.org/ |
| 144 | 26 | MANIPUR UNIVERSITY, CANCHIPUR, IMPHAL | http://en.manipuruniv.ac.in |
| 145 | 27 | MAULANA AZAD NATIONAL URDU UNIVERSITY, ACHIBOWLI, HYDERABAD | http://www.manuu.ac.in/ |
| 146 | 28 | MIZORAM UNIVERSITY, AIZAWL, MIZORAM | http://www.mzu.edu.in/ |
| 147 | 29 | NAGALAND UNIVERSITYKOHIMA, NAGALAND | http://nagalanduniversity.ac.in |
| 148 | 30 | NORTH EASTERN HILL UNIVERSITYLOWER LACHUMERE, SHILLONG | http://www.nehu.ac.in/ |
| 149 | 31 | PONDICHERRY UNIVERSITY, PUDUCHERRY | http://www.pondiuni.edu.in/ |
| 150 | 32 | RAJIV GANDHI UNIVERSITY, ITANAGAR, ARUNACHAL PRADESH | http://www.rgu.ac.in/ |
| 151 | 33 | SIKKIM UNIVERSITYM TADONG, GANGTOK, SIKKIM | http://www.cus.ac.in |
| 152 | 34 | TEZPUR UNIVERSITYNAPPAM, DIST. SONITPUR, TEZPUR, ASSAM | http://www.tezu.ernet.in/ |
| 153 | 35 | THE ENGLISH AND FOREIGN LANGUAGES UNIVERSITY, O.U. CAMPUS, HYDERABAD | http://www.efluniversity.ac.in/ |
| 154 | 36 | TRIPURA UNIVERSITY, SURYAMANINAGAR, AGARTALA | http://www.tripurauniv.in/ |
| 155 | 37 | UNIVERSITY OF ALLAHABADALLAHABAD, UTTAR PRADESH | http://www.allduniv.ac.in/ |
| 156 | 38 | UNIVERSITY OF DELHI | http://du.ac.in/ |
| 157 | 39 | UNIVERSITY OF HYDERABAD | http://www.uohyd.ac.in |
| 158 | 40 | VISVA BHARATISHANTI NIKETAN, WEST BENGAL | http://www.visva-bharati.ac.in |
| 159 | 41 | MAHATMA GANDHI CENTRAL UNIVERSITY, MOTIHARI, BIHAR | http://www.mgcub.ac.in |
| **Sr.** | **No.** | **IISc. BENGALURU & IISERs** | **Website** |
| 160 | 1 | INDIAN INSTITUTE OF SCIENCE, BENGALURU | http://www.iisc.ernet.in/ |
| 161 | 2 | INDIAN INSTITUTE OF SCIENCE EDUCATION AND RESEARCH (IISER) BHOPAL | https://www.iiserb.ac.in |
| 162 | 3 | INDIAN INSTITUTE OF SCIENCE EDUCATION AND RESEARCH | http://www.iisermohali.ac.in |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (IISER) MOHALI | |
| 163 | 4 | INDIAN INSTITUTE OF SCIENCE EDUCATION AND RESEARCH (IISER) KOLKATA | http://www.iiserkol.ac.in/ |
| 164 | 5 | INDIAN INSTITUTE OF SCIENCE EDUCATION AND RESEARCH (IISER) PUNE | http://www.iiserpune.ac.in/ |
| 165 | 6 | INDIAN INSTITUTE OF SCIENCE EDUCATION AND RESEARCH (IISER) THIRUVANANTHAPURAM | http://iisertvm.ac.in/ |
| 166 | 7 | INDIAN INSTITUTE OF SCIENCE EDUCATION AND RESEARCH (IISER) BERHAMPUR | www.iiserbpr.ac.in/ |
| 167 | 8 | INDIAN INSTITUTE OF SCIENCE EDUCATION AND RESEARCH (IISER) TIRUPATI | www.iisertirupati.ac.in |
| **Sr.** | **No.** | **OTHER INSTITUTES** | **Website** |
| 168 | 1 | INDIAN BUSINESS SCHOOL, HYDRABAD | http://www.ibshyderabad.org/ |
| 169 | 2 | BIRLA INSTITUTE OF ECHNOLOGY, PILANI, RAJASTHAN & RANCHI, JHARKHAND | http://www.bits-pilani.ac.in/ |
| | 3 | VEERMATA JIJABAI TECHNOLOGY INSTITUTE,MATUNGA,MUMBAI | www.vjti.ac.in/ |
| 171 | 4 | COLLEGE OF ENGINEERING, PUNE | www.coep.org.in/ |
| 172 | 5 | U.I.C.T. MUMBAI | http://www.ictmumbai.edu.in/ |
| 173 | 6 | FOREST RESEARCH INSTITUTE, DEHARADHUN | http://www.fridu.edu.in/ |
| 174 | 7 | CENTRAL ELECTRONICS ENGINEERING RESEARCH INSTITUTE, PILLANI | www.ceeri.res.in/ |
| 175 | 8 | CENTRAL INSTITUTE OF FISHERIES NAUTICAL & ENGINEERING TRASHING,KOCHI | http://www.cift.res.in/ |
| 176 | 9 | CENTRAL INSTITUTE OF PSYCHIATRY,RANCHI | http://cipranchi.nic.in/ |
| 177 | 10 | CENTRAL LEATHER RESEARCH INSTITUTE,CHENNAI | www.clri.org/ |
| 178 | 11 | DR. AMBEDKAR INSTITUTE OF PRODUCTIVITY, CHENNAI | www.aipnpc.org/ |
| 179 | 12 | NATIONAL DAIRY RESEARCH INSTITUTE, KARNAL, HARYANA | http://www.ndri.res.in/ |
| 180 | 13 | NATIONAL CHEMICAL LABORATORY,PUNE | www.ncl-india.org/ |
| 181 | 14 | NATIONAL PHYSICAL LABORATORY, NEW DELHI | www.nplindia.in/ |
| 182 | 15 | CENTRAL DRUG RESEARCH INSTITUTE,LUCKNOW | www.cdri.res.in/ |
| 183 | 16 | CENTRAL FOOD TECHNOLOGICAL RESEARCH INSTITUTE,MYSORE | www.cftri.com/ |
| 184 | 17 | NATIONAL INSTITUTE OF OCEANGRAPHY,PANAJI,GOA | www.nio.org/ |
| 185 | 18 | INDIAN INSTITUTE OF HORTICULTURAL RESEARCH,BANGLORE | www.iihr.ernet.in/ |
| 186 | 19 | C-DAC, PUNE | https://cdac.in/ |
| 187 | 20 | NATIONAL INSTITUTE OF DESIGN,BENGALURU | www.nid.edu/ |
| 188 | 21 | UNIVERSITY OF PETROLIUM & ENERGY,DEHRADUN | www.upes.ac.in/ |
| 189 | 22 | GUJRAT NATIONAL LAW UNIVERSITY,GUJRAT | https://www.gnlu.ac.in/ |
| 190 | 23 | FILM & TELEVISION INSTITUTE,PUNE | www.ftiindia.com/ |
| 191 | 24 | NATIONAL SCHOOL OF DRAMA, NEW DELHI | https://nsd.gov.in/ |
| 192 | 25 | JAMANALAL BAJAJ INSTITUTE OF MANAGEMENT,MUMBAI | http://jbims.edu/ |
| 193 | 26 | NATIONAL INSTITUTE OF FOOD TECHNOLOGY ENTREPRENEURSHIP & MANAGEMENT, KUNDLI,DISTRICT-SONEPAT,HARYANA | www.niftem.ac.in/ |
| 194 | 27 | INDIAN MARITIME UNIVERSITY,CHENNAI | www.imu.edu.in/ |
| 195 | 28 | INDIAN MARITIME UNIVERSITY,MUMBAI | https://www.imumumbai.com/ |
| 196 | 29 | INDIAN MARITIME UNIVERSITY,KOLKATA | http://www.imu.edu.in/ |
| 197 | 30 | INDIAN MARITIME UNIVERSITY,VISHAKHAPATTANAM | www.imu.edu.in/ |
| 198 | 31 | PANDIT DEENDAYAL PETROLEUM UNIVERSITY,GUJRAT | www.pdpu.ac.in/ |
| 199 | 32 | NATIONAL INSTITUTE OF INDUSTRIAL ENGINEERING (NITIE), MUMBAI | https://www.nitie.edu/ |

| | | | |
|---|---|---|---|
| **200** | 33 | **ENTREPRENUERSHIP DEVELOPMET INSTITUTE, AHMEDABAD** | www.ediindia.org/ |

तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र.४०२/शिक्षण-१, दि. १९ मार्च, २०१८ अन्वये वरील नमूद तक्त्यामधील  संस्थांच्या इतर शाखा/उपशाखा निर्माण झाल्यास त्यामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता देखील सदरहू योजना लागू राहिल.

**( Babasaheb Beladar )**
**Commissioner, Social Welfare,**
**Maharashtra State, Pune**

## -अर्जाचा नमुना-

## राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी "राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना"

| अर्जदाराचा<br>फोटो<br>(स्व साक्षांकित) |
|---|

**प्रति,**
मा. आयुक्त,
समाज कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, ३, चर्च पथ, पुणे- ४११ ००१.

विषय : राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी "राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना"

महोदय,

"राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना" या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मी माझी वैयक्तिक व माहिती या अर्जाव्दारे खालीलप्रमाणे सादर करीत असून, मला सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी, अशी विनंती आहे.

**(अ) अर्जदाराची सर्वसाधारण माहिती:-**

| | | |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव :- | |
| २. | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- | |
| ३. | भ्रमणध्वनी (mobile)क्रमांक :- | |
| ४ | विद्यार्थ्याची जात :- | |
| ५ | (अ) विद्यार्थ्याची जन्म तारीख :-<br><br>(ब) दि.१.६.२०२५ रोजीचे वय:- | (अंकामध्ये ) ------------------------------------<br>(अक्षरी) --------------------------------------<br>------वर्षे |
| ६ | विद्यार्थ्याचा ई-मेल :- | |
| ७ | विद्यार्थ्याचा आधार क्रमांक/नोंदणी क्रमांक:- (सोबत प्रत जोडावी.) | |

<table>
<tr><td>८</td><td colspan="7">महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय ?</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>९</td><td colspan="9">शैक्षणिक स्थिती/पात्रता माहिती-</td></tr>
<tr><td></td><td>परीक्षेचे नांव</td><td>उत्तीर्ण अभ्यासक्रमाचे नांव</td><td>परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष</td><td>उत्तीर्ण झालेल्या शैक्षणिक संस्थेचे नांव व विद्यापीठाचे नांव</td><td>विद्यापीठाचे एकूण गुण</td><td>प्राप्त केलेले गुण</td><td colspan="3">गुणांची टक्केवारी (Grade/ GPA/ CGPA etc असल्यास टक्केवारी दर्शविलेले प्रमाणपत्र जोडणे</td></tr>
<tr><td></td><td>SSC</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td>HSC</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td>पदविका</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td>पदवी</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td>पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदवीका</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>१०</td><td colspan="5">(अ) विद्यार्थ्याचा व्यवसाय<br>(ब) नोकरी करीत असल्यास नोकरीचा तपशील<br>(क) हुद्दा /पदनाम<br>(ड) अर्जदारास व्यवसाय/नोकरीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न (पुरावा जोडावा)</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td></td><td colspan="5">(फ) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा पत्ता:-</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td></td><td colspan="5">(ह) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक:-</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td></td><td colspan="5">(ग) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा ई मेल-</td><td colspan="4"></td></tr>
<tr><td>११</td><td colspan="5">(अ) वैवाहिक स्थिती-</td><td colspan="4">विवाहित/अविवाहित-</td></tr>
<tr><td>१२</td><td colspan="5">विद्यार्थ्याच्या आधार संलग्न भारतातील बँक खात्याची माहिती-<br>१.खातेदाराचे नाव-<br>२.बँकेचे नाव-<br>३.बँक शाखेचे नाव-</td><td colspan="4"></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | ४.खाते क्र.-<br>५.IFSC क्र.-<br>६.MICR क्र.- | |
| १३ | विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या संस्थेचे नाव | |
| १४ | संस्थेचा संपूर्ण पत्ता | |
| १५ | दूरध्वनी क्रमांक ( एस टी डी कोड सह )<br>E-mail address | |
| १६ | विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नाव | |
| १७ | संस्थेत प्रवेश घेतल्याचा दिनांक | |
| १८ | प्रवेशीत अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी- | |
| १९ | राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी अर्ज करीत असताना कोणत्या वर्षात शिकत आहे ? (प्रथम / द्वितीय / तृतिय / चतुर्थ) | |
| २० | **शासन निर्णय मधील परिशिष्ट ब मधील संस्था आहे काय? असल्यास अ.क्र.** | **आहे / नाही**<br>**अ.क्र.=** |
| (ब) अर्जदाराच्या पालकांची सर्वसाधारण माहिती:- | | |
| १ | (अ) विद्यार्थ्यांच्या पालकाचे संपूर्ण नांव:- | |
| | (ब) पालकांचा निवासस्थानाचा पूर्ण पत्ता:- | |
| | (क) संपर्काचा दूरध्वनी क्रमांक:-<br>(एस.टी.डी. कोडसह / मोबाईल क्रमांक)<br>(ड) ई-मेल पत्ता:- | |
| २ | (अ)विद्यार्थ्यांचा पालकांचा व्यवसाय<br>(ब) पालक नोकरी करीत असल्यास नोकरीचा तपशील<br>(क) हुद्दा /पदनाम<br>(ड) पालकांस व्यवसाय/नोकरीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न (पुरावा जोडावा) | |
| | (इ) पालकांच्या कार्यालयाचा पत्ता:- | |

| | | |
|---|---|---|
| | (ई) कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक:-<br>(एस.टी.डी कोडसह) | |
| | (उ) कार्यालयाचा ई -मेल आयडी :- | |

(क) कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळुन वार्षिक उत्पन्नाबाबतची माहिती:-

| | | |
|---|---|---|
| १ | कुटुंबातील सर्व व्यक्तीचे सन २०२४-२५ मधील सर्व मार्गाने मिळणारे एकूण उत्पन्न:-<br>(यामध्ये विद्यार्थी व कुटुंबात इतर व्यक्ती नोकरी अथवा व्यवसाय करीत असल्यास त्यांचे एकत्रित उत्पन्न उत्पन्नाच्या दाखल्यात नमूद करावे व त्याबाबतचे आयकर विवरणपत्र अर्जासोबत सादर करावे. वडील हयात नसल्यास तसा अर्जात उल्लेख करुन मृत्यूचा दाखला जोडणे आवश्यक आहे किंवा विभक्त असल्यास तसे अर्जात नमूद करुन त्याबाबतचे न्यायालयाचे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.) | १.वार्षिक उत्पन्न रुपये --------------- जोडलेले आहे / नाही<br>२. आयकर विवरणपत्र -------------- जोडलेले आहे / नाही.<br>३. वडील हयात नसल्यास मृत्युचा दाखला जोडलेला आहे / नाही.<br>४. आई वडील विभक्त असल्यास न्यायालयाचे संबंधित कागदपत्र जोडलेले आहे / नाही. |

(ड) विद्यार्थ्याच्या कुटुंबाची माहिती :-

१ विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा तपशील:-

| अ. क्र. | संपूर्ण नांव | वय | विद्यार्थ्याशी असलेले नाते | व्यवसाय | एकूण वार्षिक उत्पन्न | यापूर्वी राज्य/केंद्र शासन शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला आहे का? |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| ५. | | | | | | |
| ६. | | | | | | |
| ७. | | | | | | |
| ८. | | | | | | |
| | | कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न- | | | | |

(फ) शैक्षणिक खर्च तपशील:-

| | | |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांने अभ्यासक्रमासाठी भरलेल्या / भरावयाच्या फी (शुल्क) चा तपशील | सन २०२५-२६ साठी खर्च |
| | शिक्षण फी-<br>परीक्षा फी-<br>नोंदणी फी-<br>जिमखाना फी-<br>ग्रंथालय फी-<br>संगणक फी-<br>वसतिगृह खर्च- | |

| | | | |
|---|---|---|---|
| | भोजन खर्च-<br>अभ्यासक्रमासाठी आवश्यक पुस्तक व शैक्षणिक खर्च (तपशील जोडावा) | | |
| | एकूण सर्व खर्च- | | रु. |
| २ | विद्यार्थ्याला खालीलपैकी मंजूर झालेल्या/प्राप्त होणाऱ्या बाबींचा तपशील-<br>१. विद्यापीठातील इतर शिष्यवृत्ती<br>२. Fellowship<br>३. Graduate Teacher Assistanceship<br>४. इतर मानधन<br>५. Campus job/library | | |
| १५ | शिष्यवृत्ती अदा करण्याच्या संदर्भातील माहिती<br>१. प्रवेश घेतलेल्या संस्थेचे नाव व संपूर्ण पत्ता<br>दूरध्वनी क्रमांक<br>फॅक्स<br>E-mail address<br>२. शिष्यवृत्ती काम पाहणारे अधिकारी यांचे नांव, पदनाम, दुरध्वनी क्रमाक<br>२. संस्थेचे बँकखाते क्रमांकाचा तपशील व खातेदाराचा हुद्दा व पत्ता<br>३. ज्या बँकेत शिष्यवृत्ती जमा करावयाची आहे. त्या बँकेचा तपशील-<br>A. Bank Name<br>B. Account Holder Name<br>C. Account No.<br>D. Branch Name<br>E. Branch Code<br>F. IFSC Code<br>G. MICR Code | | |

आम्ही असे जाहीर करतो की, वर सादर केलेली सर्व माहिती संपूर्णत: सत्य आहे. ही माहिती खोटी आढळल्यास अर्जदार सदर शिष्यवृत्तीस अपात्र ठरेल. तद्वतच फौजदारी कारवाईस पात्र राहील.

आम्ही असेही जाहीर करतो की, सदर शिष्यवृत्ती योजनेच्या अटी व शर्ती आम्ही पूर्णपणे वाचल्या असून आम्हाला समजल्या आहेत आणि त्या आम्हाला मान्य आहेत.

ठिकाण :

विद्यार्थ्याची सही :

विद्यार्थ्याचे नाव :

दिनांक :

वडिलांची सही :

वडिलांचे नाव :

सहपत्रे -

१) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचे प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र

२) सक्षम प्राधिकाऱ्याने महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याबाबत दिलेले प्रमाणपत्र.

३) इयत्ता बारावी आणि पदवी अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेची व प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती.

४) **सक्षम प्राधिका-याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र :- या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याच्या पालकाची उत्पन्नाची मर्यादा वार्षिक जास्तीत जास्त रु.६.०० लाख (अक्षरी रुपये : सहा लाख फक्त ) एवढी राहील. (सक्षम अधिकाऱ्याचा सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा), (यामध्ये विद्यार्थी व कुटुंबात इतर कोणी नोकरी व्यावसाय करित असल्यास त्यांचे एकत्रित उत्पन्न नमूद करावे व त्यांच्या बाबतचे आयकर विवरणपत्र (१६ नं. फॉर्म) अर्जासोबत सादर करावे. वडिल हयात नसल्यास तसा अर्जात उल्लेख करुन मृत्यूचा दाखला जोडणे आवश्यक आहे किंवा आई वडिल विभक्त असल्यास तसे अर्जात नमूद करुन त्याबाबतचे न्यायालयाचे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. )**

५) ज्या संस्थेत प्रत्यक्ष प्रवेश मिळाला आहे त्या संबंधित संस्थेचे पत्र व त्या संस्थेचे शुल्क आकारणीसंबंधीचे विवरणपत्र - क्षण फी, परीक्षा फी, वसतीगृह खर्च, भोजन खर्च यासह असणे आवश्यक

६) स्थानिक विद्यार्थी असतील तर त्यांनी वसतीगृह व भोजनाबाबत संस्थेचे प्रमाणपत्र घेऊन ते अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७) अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास / अर्धवट सोडल्यास शासनाने केलेला पूर्ण खर्च परत करण्यात येईल याबाबत रु १००/- च्या स्टँप पेपरवरील हमीपत्र.

८) विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी भरावयाच्या / भरलेल्या फी चा तपशील

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | **शिक्षण फी** | २. | **परीक्षा फी** | ३. | **नाव नोंदणी फी** |
| ४. | **जिमखाना फी** | ५. | **ग्रंथालय फी** | ६. | **संगणक फी** |
| ७. | **वसतिगृह खर्च** | ८. | **भोजन खर्च** | ९. | **विमा** |

१०. अभ्यासक्रमानुसार इतर आवश्यक खर्च (सविस्तर माहिती जोडावी)

११. संस्थेकडून/विद्यापीठाकडून शिक्षण फी किंवा इतर फी माफ झाली असल्यास त्याचे विवरणपत्र

१२. अन्य स्कॉलरशिप मिळाली असल्यास त्याची माहिती.

---

*टिप :-*

१) अपूर्ण व विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२) अर्जासोबत विहित कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. अपूर्ण स्वरुपातील अर्ज व आवश्यक कागदपत्राअभावी, देशांतर्गत शिष्यवृत्तीसाठी समितीने अपात्र ठरविलेल्या विद्यार्थ्यांना या आयुक्तालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

३) ज्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत कागदपत्रे जोडलेले आहेत. तथापी ते नियम व अटीच्या निकषानुसार देशांतर्गत शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांची निवड झालेली नाही असे गृहित धरावे. याबाबत त्यांच्याशी या कार्यालयाकडून पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४) अर्जासोबत जोडलेले सर्व कागदपत्रे साक्षांकित करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील याची नोंद घ्यावी.

XXX

(₹.१००/- च्या स्टॅम पेपर वर करणे)

## हमीपत्र

मी..........................................................................राहणार (पत्ता)........................................ .......................................................................................... येथे राहत असून माझी महाराष्ट्र शासनामार्फत देशांतर्गत...........................................................................येथे .....................................................या वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी सन २०२५-२६ या वर्षाकरिता देशांतर्गत शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. त्यानुषंगाने मी खालील प्रमाणे हमी देत आहे.

माझा देशातील (विद्यापीठाचे नांव) .......................................................................... येथील (अभ्यासक्रमाचे नांव) ............................................ हा (कालावधी) ....................................... अभ्यासक्रम संपल्यानंतर मी माझ्या ज्ञानाचा देशासाठी उपयोग करीन याची मी हमी देत आहे.

मला शासनाने मंजूर केलेले, विद्यापीठ व अभ्यासक्रमामध्ये परस्पर बदल करणार नाही याची मी हमी देत आहे.

अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे/ दस्त हे खोटे व बनावट असल्याचे आढळून आल्यास शिष्यवृत्ती पोटी मिळालेली सर्व रक्कम व्याजासह परत करण्याची हमी देत आहे.

कोणत्याही कारणास्तव अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शिष्यवृत्ती पोटी मिळालेली सर्व रक्कम ही कुटूंबाच्या मालकीच्या / जामीनदार यांच्या स्थावर मालमत्ते मधून एकरकमी भरपाई करण्याची हमी देत आहे.

वरील नमूद केलेला सर्व मजकूर बरोबर असून तो मी वाचून समजून घेऊन आज दिनांक ..................रोजी मुक्कामी सही केली असे. वरील मजकूरापैकी कोणताही मजकूर खोटा आढळल्यास मी भारतीय दंड संविधान कलम १९३ (२), १९९,२०० अन्वये शिक्षेस पात्र असेन.

स्थळ :
दिनांक :     /     /२०२५.

| | | |
|---|---|---|
| सही<br>(विद्यार्थी) | सही<br>(पालक) | सही<br>(जामीनदार) |
| संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र. / मो.क्रं.<br>आधार क्रमांक | संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र. / मो.क्रं.<br>आधार क्रमांक | संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र. / मो.क्रं.<br>आधार क्रमांक |